नागपूर येथें भरलेली

# पांचवी

# मराठा शिक्षणपरिषद.

अध्यक्ष

श्री. रा. रामराव अमृतराव डफळे,

चीफ ऑफ जत

यांचें भाषण.

ता. २९ डिसेंबर १९११.

# मराठा शिक्षणपरिषद.

नागपूर १९११.

## अध्यक्षांचें भाषण.

सद्भगिनी व सद्गृहस्थहो:—

आज रोजीं आपण ह्या आपल्या " मराठा–शिक्षण–परिषदे " च्या पांचव्या बैठकीला सुरुवात करीत आहों. ह्या परिषदेचा जन्म धारवाडांत होऊन तेथून मुंबई, उमरावती व बडोदें ह्या शहरीं बैठका होऊन यंदां आपण इतिहासप्रसिद्ध अशा ह्या भोंसले घराण्याच्या नागपूर शहरीं पांचव्या बैठकीकरितां जमलों आहों. आजच्या प्रसंगीं कोणातरी वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध अशा सद्गृहस्थांची योजना अध्यक्षाच्या अत्यंत जबाबदारीच्या जागेवर होणें फार जरूर होतें. मजसारख्याजवळ वय व ज्ञान ह्या दोहोंचीही तुटपुंजी. त्यामुळें प्रथमतः मला अध्यक्ष होण्याची सूचना समजून येतांच ह्या स्थानाच्या बहुमानापेक्षां तेथल्या जबाबदारीचीच जाणीव माझ्या मनांत जास्त उभी राहिली व एकदां ह्या भानगडींत न पडण्याचा मीं विचार केला होता. परंतु प्रसंग प्राप्त झाला असतां त्या वेळीं पाठ दाखविणें हेंही योग्य नव्हे, असा विचार तत्क्षणींच माझ्या मनांत उत्पन्न झाला. त्याचप्रमाणें ह्या शिक्षणपरिषदेच्या कार्यकारी मंडळानें केलेली आज्ञा अमान्य करणें हेंही परम दुर्घटच. अशा तऱ्हेनें दोहों बाजूंच्या माऱ्यांतून वाट कशी काढावी, ह्या काळजींत असतां परमेश्वरी प्रेरणेनें मनांत कल्पना आली कीं, नामर्दाप्रमाणें जबाबदारीपासून पळून जाण्यापेक्षां ज्या परिषदेची कार्यकारी मंडळी ही जबाबदारी मजकडे सोंपवीत आहे त्या परिषदेच्या सभासदांच्या कृपेनें व सहानुभूतीनें सर्व गोष्टी सिद्धीस कां जाणार नाहींत? ज्याप्रमाणें मजवर—त्याप्रमाणेंच सर्व मंडळीवर परिषदेची बैठक यशस्वी करून निर्विघ्नपणें पार पाडण्याची जबाबदारी आहेच. तेव्हां सर्वांची कृपा असल्यावर मी स्वतः जे वेडेवांकडे चार शब्द बोलेन ते परिषद् गोड मानून खास घेईल, व आपल्या घरचें हें कार्य आहे असें समजून सर्वतोपरि मजला सर्व मंडळी संभाळून घेतील. ही प्रेरणा मनांत उत्पन्न झाल्यावरूनच केवळ मी आज आपणांपुढें येऊन उभा रहात आहे. आपण सर्वांनीं आज अध्यक्षाचा जो अपूर्व मान मजला दिला आहे, त्याबद्दल मी आपला किती अंतःकरणपूर्वक आभारी आहे तें शब्दांनीं व्यक्त करून सांगणें मला अशक्य आहे. माझ्या सर्व आयुष्यभर आजच्या मानाचें बहुमोल मी कधींही विसरणार नाहीं व मी त्याविषयीं आपणा सर्वांचा सदैव ऋणी राहीन. आपणा सर्वांना माझी सविनय प्रार्थना हीच आहे कीं, पूर्ण सहानुभूति व कृपादृष्टि ठेवून मजकडून समाजसेवा करवून घ्यावी व आपणच उभारलेल्या ह्या बिकट कार्याचा निर्विघ्नपणें शेवट लावण्याचें श्रेय संपादावें.

२. एवढी प्रस्तावना करून आतां परिषदेच्या कामाला सुरुवात करण्यास हरकत नाहीं. सर्वांत प्रथमचें कार्य—व अत्यंत मधुर असें कार्य—करण्याचें तें हें कीं, ज्या प्रभूंच्या कृपाछत्रा-

खालीं ह्या भरतभूमीमध्यें ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत शांततादेवीचें साम्राज्य पसरलें आहे त्या बादशहा पंचम जॉर्ज व महाराणी मेरी ह्यांचें सद्गदित अंतःकरणपूर्वक स्वागत करणें हें होय. हें अत्यंत पवित्र कार्य ह्या परिषदेच्या मार्फत करण्याचें माझ्या वांट्यास आलें आहे ही गोष्ट मी वैयक्तिक दृष्ट्या मोठ्या भाग्याची समजतों व या एका गोष्टी करतांच मी आपलें हें स्थान मला दिल्याबद्दल आभार मानितों. बंधुहो, बादशहा पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांच्या आगमनाच्या विचारानें सुद्धां आपणां सर्वांचीं अंतःकरणें हर्षातिशयानें उचंबळून जावींत ह्या गोष्टीचें कोणालाही आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. अशा थोर व वंदनीय विभूतीचें प्रत्यक्ष आगमन आपल्या भरतखंडांत व्हावें हा विचारही कांहीं महिन्यांपूर्वी अत्यंत अशक्य असा वाटत असे. प. वा. महाराणी व्हिक्टोरिआ ह्यांचें हिंदी प्रजेवर अलोट प्रेम असूनही त्यांच्या काळीं त्यांच्या प्रत्यक्ष आगमनाची संभवनीयता दृष्टीस पडली नाहीं. फक्त त्यांचें चरित्र वाचून व चित्रें पाहूनच मनीषा तृप्त करून घ्यावी लागत असे. त्यांच्यामागून सप्तम एडवर्ड हे प्रिन्स ऑफ वेल्स ह्या नात्यानें तरी हिंदुस्थानांत एकदां येऊन गेले होते. परंतु सम्राट् पंचम जॉर्ज ह्यांच्या हृदयांत हिंदवासी प्रजेबद्दल इतकें कल्पनातीत प्रेम वसत आहे कीं, त्यांची स्वारी प्रिन्स ऑफ वेल्स ह्या नात्यानें जरी पूर्वी एकदां इकडे येऊन गेली होती तरी तेवढ्यानें त्यांचें समाधान होणें केवळ अशक्य होतें. त्यावेळीं हिंदुस्थानवासी प्रजेचें राजघराण्यावरचें प्रेम किती निःसीम होतें ही गोष्ट त्यांच्या पूर्णपणें निदर्शनास आली व म्हणूनच आपण राज्यारूढ झाल्याची मंगलकारक बातमी स्वमुखानें जाहीर करण्याकरितां त्यांची स्वारी महाराणी मेरी यांच्या समवेत हल्लीं हिंदुस्थानांत आली आहे. अशा समयीं आपणां सर्वांचीं अंतःकरणें अभूतपूर्व मानामुळें झालेल्या आनंदानें कशीं तुडुंब भरून गेलीं आहेत हें उघडपणें येवढ्या थोरल्या परिषदेंत जाहीर करण्याचें अत्यंत मधुर, पवित्र व मंगलकारक असें कार्य प्रथम करण्याचें आपणां सर्वांचें आद्य कर्तव्य आहे. हल्लींची महापर्वणी आपणांस कितीतरी शतकांनीं लाभत आहे, हें वरवर इतिहास चाळणाऱ्यांसही माहीत आहेच. मी आपणां सर्वांच्या वतीनें पुन्हां एकदां बादशहा पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांचें सुस्वागत करतों व परमेश्वराजवळ अनन्यभावेंकरून प्रार्थना करितों कीं, बादशहांचा हिंदुस्थानांतील प्रवास अत्यंत सुखावह होवो व त्यांचें प्रजाजनांवरील प्रेम आणखी शतपट वाढून पुनः पुनः त्यांचीं पुण्यकारक पाउलें ह्या भरतखंडाकडे वळोत. अशा महात्म्याच्या आगमनानें आमच्या अंतःकरणांतून सत्प्रेरणा होऊं लागतील व राजा व प्रजा ह्यांचा अन्योन्य संबंध जास्त दृढ होत जाऊन त्याचीं मधुर फळें उभयतांनाही खात्रीनें उपभोगण्यास मिळूं लागतील असा दृढ विश्वास अखिल प्रजाजनांच्या अंतःकरणांत वसत आहे. बादशहांच्या आगमनाचा मंगल प्रसंग अखिल प्रजेस आनंद देणाऱ्या ... झाला आहे व त्याबद्दल ही ...

२. हा ...
" मराठा शिक्ष... ह्या संस्थेच्या ... वेळीं ते उद्देश ... ठिकाणीं चुकीं ... दुसरें असें क... तःचाही फायदा होण्याचा संभव आहे. या पुनरुच्चारणानें आपण ... कोणच्या स्थळापर्यंत जाणार आहों व आजपर्यंत आपण किती मजल मारली आहे ह्याची स्पष्ट जाणीव आपल्या अंतःकरणास सहज होऊन जाईल व हातून सिद्धीस गेलेलें कार्य नजरेस

### लॉर्ड क्रू व लॉर्ड हार्डिंज यांचें अभिनंदन.

३. आतांपर्यंत बादशहांच्या देणग्यांचा जो उल्लेख केला आहे, त्याची पूर्तता,—त्या देणग्यांसंबंधानें बादशहांना योग्य सल्ला देणारे, त्यांचे मंत्री लॉर्ड क्रू व लॉर्ड हार्डिंज, ह्यांचें त्यांच्या ह्या आस्थेच्या व कळकळीच्या सल्ल्याबद्दल कृतज्ञताबुद्धीनें-अभिनंदन केल्याशिवाय व्हावयाची नाहीं. लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं हिंदुस्थानचा कारभार हातीं घेतला, त्या वेळेस हिंदी प्रजेनें त्यांच्या कारकिर्दीसंबंधानें ज्या आशा व आकांक्षा प्रगट केल्या होत्या; त्या आज सफल झालेल्या पाहून मोठा हर्ष होतो; व त्यांची कारकीर्द हिंदुस्थानाला उत्तरोत्तर सुख-समृद्धीची होईल, अशी उमेद वाटते. लॉर्ड क्रू व लॉर्ड हार्डिंज यांनीं बादशहांना दिलेल्या ह्या सल्ल्याबद्दल त्यांचें मी आपल्या समाजातर्फे मनःपूर्वक अभिनंदन करितों.

पडून पुढील कार्यास हात घालण्याची उमेद धरणें शक्य होईल. अशा तऱ्हेनें दरसाल एकदां सिंहावलोकन करणें म्हणजे वर्षअखेरचा जमाखर्चाचा आढावा काढून पुढील सालाविषयीं अंदाजपत्रक तयार करणें होय आणि हें कोणच्याही संस्थेला अत्यंत जरूरीचें आहे. आपल्या परिषदेचे उद्देश सर्वश्रुत नसतील तर ते तसे करणें हें आपलें आवश्यक कर्तव्य आहे.

४. सन १९०९ सालीं उमरावती येथील परिषदेच्या बैठकींत आपण "मराठा शिक्षणपरिषदेचे नियम " अथवा कॉन्स्टिट्यूशन ठरवून टाकलेली आहे. त्यांतील दुसऱ्या नियमांत परिषदेचा मुख्य उद्देश स्पष्टपणें नमूद करून ठेविलेला असा आहे कीं, "मराठा ज्ञातीच्या लोकांची शिक्षणद्वारां उन्नति करणें " हा परिषदेचा मुख्य उद्देश आहे. ह्या स्पष्ट भाषेवरून कोणाच्याही लक्षांत सहज येईल कीं, केवळ शिक्षणसंबंधीं प्रश्नांचा ऊहापोह करण्याचा ह्या संस्थेचा उद्देश आहे. हिजला राजकीय प्रश्नांचें वारें सुद्धां चालावयाचें नाहीं. राष्ट्राच्या एकीकरणासारखे अथवा राजकीय परिस्थितीच्या पर्यालोचनासारखे प्रश्न परिषदेच्या कार्यपरिघाबाहेरचे आहेत. फक्त मराठे ज्ञातीमध्यें शिक्षणाचा प्रसार कोणत्या उपायांनीं होईल व हल्लींची मराठे ज्ञातीची निकृष्टावस्था कोणच्या उपायांनीं सुधारून आम्हांला उत्तम स्थिति प्राप्त होईल एवढ्याच गोष्टींचा आपणांस येथें विचार करण्याचा आहे. एकंदर मराठा ज्ञात आपल्या देशांत जवळ जवळ एक कोटीपर्यंत भरेल. हा समाज संघशक्तीनें संलग्न झाला असतां काय पाहिजे तें करूं शकेल. निदान अत्यंत रास्त रितीचें यत्किंचित्‌ही अतिक्रमण न करतां व अन्य ज्ञातींना किमपिही न दुखवितां आपण आपली उन्नति सहज करूं शकूं. हल्लीं मराठे मंडळीची किती शोचनीय अवस्था झाली आहे हें तुम्हांला स्पष्ट करून सांगणें म्हणजे पिष्टपेषण करणें होईल. पूर्वींचीं कित्येक उदयाला आलेलीं घराणीं नामशेष होऊन त्यांचा आतां मागमूसही राहिलेला नाहीं; जे इनामदार, वतनदार वगैरे आहेत ते बहुतेक कर्जबाजारी असून त्यांची तर फारच विपन्नावस्था आहे. आपणांतील जे शेंकडा नव्वदपर्यंत लोक शेतीच्या धंद्यांत पडलेले आहेत त्यांचीही अवस्था कष्टमय आहे. नवीन परिस्थिति ओळखून त्याप्रमाणें आपलें वर्तन व आयुष्यक्रम सुधारण्याचें धोरण मराठ्यांत अत्यंत सूक्ष्म प्रमाणावरही दृग्गोचर होण्यास फार प्रयास करावे लागत आहेत. पूर्वी एके काळीं अखिल भरतखंडांत यश संपादन करीत फिरणारे मराठे आपलेच पूर्वज व आम्हीच त्यांचे वंशज कीं नाहीं अशी शंका प्रस्तुतच्या आमच्या दशेमुळें उत्पन्न होऊं लागल्यास नवल तें काय? ह्या सर्व ऱ्हासाचें कारण काय हा प्रश्न जर आपण आपल्या मनाला करूं लागलों तर एकच उत्तर मिळणें शक्य आहे असें मला वाटतें व तें उत्तर हें कीं, आपल्या ज्ञातीमध्यें परिस्थिति ओळखून कार्यक्रमाची दिशा बदलण्याचें धोरण फार सूक्ष्म आहे. कोणी म्हणतील कीं, आम्हांत शिक्षण नाहीं म्हणून आम्ही मागें राहिलों. पण यावर दुसरा प्रश्न हा येणारच कीं, आमच्यांत शिक्षण तरी कां नाहीं; इतर ज्ञातींनीं ज्याप्रमाणें शिक्षण मिळविलें त्याप्रमाणें आमच्या ज्ञातीनें शिक्षण मिळविण्यास कोणीं तिचे हात बांधले होते काय ? ब्राह्मणांनीं संस्कृत विद्येपासून आम्हांस दूर ठेविलें म्हणून आमच्यांतील कांहीं मंडळी त्यांच्या नांवानें खडे फोडीत असतात. परंतु मला तें मत मुळीं मान्य नाहीं. त्या वादांत ह्या वेळीं न पडतां मी या माझ्या बंधूंना असा प्रश्न विचारितों कीं, इकडे इंग्रजी राज्य सुरू होऊन जवळ जवळ शंभर वर्षें होत आलीं व इंग्रज सरकारानें तरी सर्व ज्ञातींना शिक्षणाची सोय सारखीच करून सर्वांना सारखीच मुभा ठेवली होती ना ? मग शंभर वर्षें सर्वांना एकसारख्या सवलती असूनही आज शिक्षणामध्यें इतके मागसलेले असे आम्ही कां राहिलों ? युनिव्हर्सिटी–शिक्षणाचें तर नावच नको, पण साध्या शिक्षणांतही पाहिलें तर आपणांमध्यें साधारणपणें लिहितां वाचतां येणारीं माणसें दर हजारीं असावी ही फार शोच-तां येणार नाहीं. माझ्या

आपल्या समाजांत आहेत; त्यांपैकीं जर कोणी आज अध्यक्ष-स्थानीं विराजमान झाले असते, तर मला विशेष आनंद झाला असता. असो, दिलेल्या मानाबरोबरच मजी थोरली जबाबदारीही माझ्या आली येत आहे; तींतून पार पडावयाला उभयतां राजेसाहेब, आपल्या, समाज-बांधवांचें आपल्या, सहाय्याची अपेक्षा आहे.

[illegible] व महाराणी यांचें अभिनंदन.

मतें ह्या सर्वांचें एकच कारण आहे व तें हें कीं, बदललेली परिस्थिति ओळखण्याचें धोरण आमच्यांत फार कमी आहे. अल्प शिक्षण झालें कीं ' आम्हां मराठ्यांना जास्त शिकून काय करायाचें ' हा प्रश्न विचारण्याचीच उत्सुकता जास्त आढळून येते. एवंच, निःपक्षपात दृष्टीनें पाहिलें तर आपलेच पदरीं दोषाचें माप भरपूर येऊं लागतें.

५. हा दोष हळू हळू कमी व्हावा व आपल्या उन्नतीकरितां आपण स्वतः प्रयत्न — दीर्घ प्रयत्न—करावा, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. इतर ज्ञातींच्या परिषदांशीं आमचा बिलकुल विरोध नाहीं व तो नसणें हेंच खऱ्या देशहितचिंतकांचें ब्रीद आहे. ज्यानें त्यानें आपआपलें घर दुरुस्त करावें, कोणीं कोणास हरकत करूं नये, अगर कोणीं कोणाच्या नांवानें हांका मारीत बसूं नये. "आत्मैव आत्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः" हें भगवंतांनीं सांगितलेलें सत्य त्रिकालाबाधित आहे. दुसऱ्यांना दोष देण्याची पाळी ज्यावर आली, त्यानें स्वतःचेच वर्तन क्रमांत दोष असेल असें सत्कृद्दर्शनीं समजलें पाहिजे. विनाकारण एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढीत बसण्यांत समाधान मानण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. प्रत्यक्ष कांहीं कृति करून दाखविली पाहिजे. एकमेकांना नांवें ठेवण्यांत जो काल जातो त्याचा उपयोग स्वतःची सुधारणा करण्याकडे जर केला तर किती तरी बहार उडून जाईल. एकमेकांनीं एकमेकांना मदत करण्याची परंपरा आपले देशांत जेवढी पूर्वीपासून दृष्टीस पडत असे, तेवढीही हल्लीं न दिसण्यासारखे उद्गार एकमेकांनीं काढावे हें अत्यंत लांच्छनास्पद होय. ब्राह्मण, सारस्वत, प्रभु वगैरे ज्ञातींना जवळ करून त्यांच्या अंगच्या गुणांचा योग्य उपयोग करून घेण्याचा कित्ता अतुलप्रतापी श्रीशिवाजीमहाराजांनीं इतिहासांत घालून दिलेला आढळतो. त्या शिवाजीमहाराजांपेक्षां हल्लीं आम्ही जास्त शहाणे झालों आहोंत कीं काय ? आपण आपले दोष झांकण्याकरितां इतर ज्ञातींना दोष देऊन आपणा स्वतःला फसवून मात्र घेत आहोंत. ह्या गोष्टीचा आपण शांत चित्तानें स्वतःशीं विचार करा. दादोजी कोंडदेवासारखे व श्रीसमर्थ रामदासस्वामींसारखे पुरुष कोण ज्ञातीचे होते; बाजीप्रभु, मुरारबाजीसारखे वीर कोण ज्ञातीचे होते, तें नीटपणें लक्षांत आणा. स्वतःच्या सुखोपभोगाचा विचार सोडून देऊन केवळ परहित साधण्याकरितां झटणारीं माणसें हल्लीं आपल्या ज्ञातींत किती सांपडतील व तुम्ही नांवें ठेवतां त्या ज्ञातींत हल्लीं किती सांपडतील ह्याचा निःपक्षपातानें आपल्या स्वतःशीं शोध लावा. पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे प्रिन्सिपाल रँगलर परांजपे, उमरावतीच्या आपल्या परिषदेंत परमपूज्य गुरु ह्मणून वंदन केलेले रा. सा. विष्णु मोरेश्वर महाजनी, आपल्या दुसऱ्या परिषदेच्या रिपोर्टांत ज्यांचें चरित्र परमादरानें ग्रथित केलें आहे ते प्रो० राजारामशास्त्री भागवत, परपूज्य सर डॉ. भांडारकर असल्या विभूती कोणच्या ज्ञातीला भूषित करीत आहेत तें पाहून तरी त्या ज्ञातींच्या नांवानें खडे फोडीत बसण्याची हौस आंवरून धरावी लागेल. वाईट माणसें त्या ज्ञातींत नाहींत असें नाहीं, पण त्या ज्ञाती तसल्या माणसांनींच भरलेल्या आहेत असें ह्मणण्याचें धाष्टर्य कोण करील ? याकरितां जेथें जेथें जो गुण सांपडेल त्याचा अवश्य उपयोग करून घ्यावा व आपलें कार्य साधण्यास ज्या कोणाचीही मदत होण्याचा संभव असेल त्याजपासून आनंदानें—इतकेंच नव्हे हक्कानें—मदत मागून घ्यावी, म्हणजे आपला कार्यभाग जास्त साहजिकपणें सिद्धीस जाईल.

६. इतर ज्ञातींविषयीं माझे विचार असे असल्यावर आपणां मराठे लोकांतल्या पोटज्ञातींविषयीं माझे विचार कसे असतील ह्याची तुम्हांला सहजच कल्पना होईल. ' मराठा शिक्षण-परिषदेंतले ' हे मराठे कोणते समजावयाचे असा कांहीं माणसांकडून कधीं कधीं प्रश्न होत असतो. परिषदेंतील मराठे अस्सल-जातिवंत मराठे एवढा संकुचित अर्थ घ्यावा असा कांहींचा आग्रह दिसतो, कित्येकांच्या मतें फक्त शहाण्णव कुळी मराठ्यांपर्यंत परिषदेची मजल जावी व आणखी

कांहींच्या मतें जे कोणी मराठे या नांवाखालीं आपल्यास गणून घेण्यास इच्छितात त्या सर्वांचा समावेश ह्या परिषदेंत व्हावा. मला वाटतें कीं, जर आपण मुख्य उद्देशाकडे जास्त लक्ष दिलें तर हे मतभेद तेव्हांच नष्ट होऊन जातील. ह्या परिषदेच्या मंडपांत आपणाला रोटी-बेटीव्यवहाराचा बिल्कुल विचार करावयाचा नाहीं. ते प्रश्न फार नाजूक आहेत व त्यांवर अभिप्राय देण्याचें धाष्टर्य करीत बसण्याचें आज येथें बिलकुल प्रयोजन नाहीं. आज प्रश्न एवढाच आहे कीं, निव्वळ शिक्षण देण्याच्यासंबंधानें सुद्धां आपण आपआपले बारीक सारीक भेद विसरून जाण्याइतके समंजस आहोंत कीं नाहीं. बारीक सारीक पोटभेदांच्या एकीकरणाचा प्रश्न आज आपणा मराठ्यांतच आहे असें नाहीं; ब्राह्मणांत आहे, सारस्वतांत तर तो जारीनें आहे, प्रभूंमध्येंही आहे व जी ती ज्ञाती आपल्या इच्छेप्रमाणें तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीतही आहे. परंतु शिक्षण द्यावें कीं न द्यावें ह्या निरुपद्रवी प्रश्नासंबंधानें मात्र बारीक सारीक पोटभेदांना इतर ज्ञातींत कोणीं महत्व दिलेलें माझ्या ऐकिवांत नाहीं.सबब मी पुनः एकवार म्हणतों कीं, मराठा शिक्षणपरिषदेमध्यें असल्या पोटभेदांच्या प्रश्नाला बिलकुल थारा मिळूं नये आणि जो कोणी मराठा म्हणवून घेत असेल त्या सर्वांना ह्या परिषदेंत बिनदिक्कत स्वागतपूर्वक येऊं द्यावें हें फार इष्ट आहे.

७. ह्या परिषदेचे नियम एकवार पास झालेले आहेत. ते तिसऱ्या परिषदेच्या रिपोर्टाच्या ४९ व्या पानांत प्रसिद्ध झाले आहेत. ह्या नियमांसंबंधानें कोठें कोठें असमाधानी ऐकण्यांत येत असते व कित्येक गृहस्थ त्या असमाधानीमुळें परिषदेच्या कार्यांत घालावें तसें उत्साहपूर्वक मन घालीत नाहींत अशी भीति वाटत आहे. अशा तऱ्हेनें आपआपसांत दुही उत्पन्न होण्याचा प्रसंग यावा हें अत्यंत शोचनीय होय. ज्या सद्गृहस्थांच्या मनांत अशी असमाधानी वसत असेल त्यांना आम्हां सर्वांचें असें हात जोडून सांगणें आहे कीं " बंधुहो, बारीकसारीक मतभेदाकरितां मुख्य कार्याचा नाश होईल अशी सर्वांना भीति वाटत आहे. कार्य इतकें अवाढव्य आहे व तें करणारे कर्ते पुरुष इतके थोडे आहेत, कीं आणखी कित्येक तरी आम्हांला पाहिजे आहेत. अशा वेळीं आहेत त्यांतलेच जर कार्यापासून मन काढून घेऊं लागले तर सर्वांचें दुर्दैव अजून संपलें नाहीं असें म्हणावें लागेल. तर असें करूं नका. तुम्हाला कोणचे नियम नापसंत आहेत तें परिषदेंत येऊन कळवा, व पूर्वीचे नियम बहुमतानें सोडून टाकून नवीन नियम बहुमतानें ठरवून टाकूं. मिडस व पर्शियन्स यांच्या कायद्यांप्रमाणें आपले नियम न बदलणारे असे थोडेच आहेत. आपणां सर्वांना ज्या अडचणी दिसतील त्या आपण काढून टाकूं. परंतु आपण नाराज होऊन उदासीनता अथवा तटस्थवृत्ति पतकरूं नका. तुमचे हेतु उत्तम आहेत हें आम्ही मोकळ्या मनानें कबूल करितों; पण त्याचप्रमाणें हल्लीं झालेले नियमही सद्धेतूनेंच करण्यांत आले आहेत हें तुम्हींही कबूल करावें. त्यांत दोष असतील व त्यासंबंधानें कदाचित् तुम्ही आमची खात्री कराल अथवा कदाचित् आम्ही तुमची करूं शकूं. पण हें सर्व दिल सफाई ठेवून काम करूं लागाल तर सहज होणार आहे. सर्वांचा हेतु—अंतिमसाध्य—एकच आहे कीं, मराठ्यांची उन्नति करावी; मग मतभेदामुळें सर्व कार्य सोडून द्यावें हें ठीक नव्हे. स्वमताचा अभिमान धरणें अमुक यत्तेपर्यंत ठीक आहे, परंतु ज्ञातीमध्यें बहुमतानें जें ठरून गेलें त्याचा स्वमतापेक्षांही जास्त अभिमान धरणें उचित आहे असें मला वाटतें. बहुजनसमाज चूक करीत आहे व आपलें म्हणणें तेवढें बरोबर आहे अशी ज्याची भावना आहे त्याजवर तर बहुजनसमाजाची समजूत घालून त्याला नीट मार्गावर आणण्याची जबाबदारी विशेष आहे असें मला वाटतें. " या माझ्या विनंतीचा आमचे सर्व ज्ञातिबंधु योग्य विचार करतील अशी मला फार उमेद आहे.

८. येथवर कांहीं वादग्रस्त मुद्यासंबंधानें मीं आपले विचार आपणांपुढें मांडले. आतां कांहीं महत्वाच्या गोष्टीसंबंधानें मला दोन शब्द बोलण्याचे आहेत, त्याकडे आपण सहानुभूतिपूर्वक लक्ष्य देऊन त्या प्रश्नांचा योग्य तो निकाल लावावा अशी माझी आपणांस सविनय विनंति आहे. मी जी गोष्ट प्रथम आपणापुढें मांडणार आहें ती आपणाला केवळ अपरिचित आहे असें मुळींच नाहीं. मात्र त्या गोष्टीचें महत्व ह्या परिषदेच्या सभासदांपुढें जितक्या जोरानें मांडण्यास पाहिजे आहे तितक्या जोरानें तें कधीं मांडलें गेलें असल्याचें मला आढळत नाहीं. मराठा शिक्षण' ह्या शब्दांवरून बहुतेक मंडळीचा असा समज झालेला दिसतो कीं, ही संस्था मुख्यत्वें करून मराठ्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरितां आहे व त्यांत स्त्रीशिक्षणाचा समावेश होत नाहीं. आजपर्यंतच्या परिषदेच्या बैठकींत पास झालेल्या ठरावांमध्यें स्त्रीशिक्षणावर एखादा ठराव पास झाल्याचें माझ्या स्मरणांत नाहीं. एवढी मात्र आनंदाची गोष्ट आहे कीं, प्रत्येक सालच्या बैठकींत स्त्रीशिक्षणासंबंधानें स्त्रियांनीं लिहिलेला एकेक निबंध वाचण्यांत आलेला आहे. आपल्या मागसलेल्या ज्ञातींत अशा तऱ्हेनें निबंध लिहून पाठविणाऱ्या व प्रत्यक्ष परिषदेंत हजर राहून स्वतः निबंध वाचून दाखविणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया आढळून याव्यात, एवढीच माझ्या मतें आपल्या एकंदर अवनतावस्थेंत समाधान मानण्यासारखी गोष्ट आहे व पूर्वींपासून सुरूं असलेली ही परंपरा यंदांच्याही बैठकींत तशीच पुढें चालूं राहील अशी मला फार उमेद आहे. रा. ब. घामणस्कर ह्यांच्या पत्नीनीं पाउणलाख रुपये किंमतीची आपली इस्टेट ह्या परिषदेच्या स्वाधीन केली आहे. तसें करण्यांत स्त्रीजातीकडून आपल्या परिषदेला केवढी मोठी बळकटी आली आहे हें कोणीही सांगेल. परंतु अशीं उज्वल उदाहरणें दृष्टीसमोर असूनही स्त्रीशिक्षणाचा प्रश्न जितक्या कळकळीनें व जोरानें आपणां सर्वांनीं हातीं घेतला पाहिजे असें मला वाटतें तितक्या जोरानें त्याचा स्वीकार झाला असल्याचें मात्र मला दिसत नाहीं.

९. सद्गृहस्थहो, स्त्रीशिक्षणाची आपल्या समाजाला हल्लींच्या काळीं किती जरूरी आहे, त्याचें विवरण करण्यास मजजवळ आणखी सहस्रपट शक्ती असती, तरी त्याचें यथार्थ वर्णन माझ्या हातून होणार नाहीं अशी माझी समजूत आहे. पुष्कळ लोकांची अशी समजूत असते कीं, स्त्रीशिक्षणाचा प्रश्न हा फक्त स्त्रियांच्या फायद्याकरितांच आहे. दुसऱ्या कितीकांची अशी समजूत असते कीं, पुरुषशिक्षणाचा प्रश्न बरोबर सुटल्यावांचून आधीं स्त्रीशिक्षणावर विशेष लक्ष्य देण्यांत हांशील नाहीं. परंतु ह्या समजुती अत्यंत चुकीच्या आहेत. आपला समाज जितक्या लवकर शिकेल तितक्या लवकर आपली उन्नति सहजपणानें होईल. पुरुषशिक्षणाला जर कशानें हल्लीं विशेष अडथळा होत असेल तर तो केवळ आपल्या स्त्रिया—म्हणजे भावी पिढीच्या आया—अज्ञानसागरांत बुडून गेलेल्या आहेत ह्या एकाच गोष्टीमुळें होय. लहानपणीं मुलांवर बापापेक्षां आईचें प्रेम व वजन कितीतरी पटीनीं जास्त असतें. बापानें दहा छड्या मारून सांगितलेल्या गोष्टीपेक्षां आईनें एकवेळ मधुरपणानें व गोडीगुलाबीनें सांगितलेली गोष्ट अंमलांत आणण्यास मुलगा कसा उत्सुक असतो त्याची आठवण करा. मुलगा आईजवळ भाकरी अगर खाऊ मागण्यास गेला असतां जर आई आधीं त्याच्या लिहिण्यावाचण्याची विचारपूस करून नंतर त्या मानानें मुलाचें कौतुक करूं लागेल, तर काय मौज होईल ! लिहिल्या वाचल्यावांचून आई भाकरी देत नाहीं, ही जाणीव जर मुलाच्या चिमुकल्या डोक्यांत एकदां पूर्णपणें ठसून गेली तर पुन्हां कधींतरी वाचन करून आल्याशिवाय मुलगा भाकरी मागण्यास घरांत जाईल काय ? अशा कुटुंबांतल्या मुलांच्या शिक्षणांत कधींच व्यत्यय येणें शक्य नाहीं. पण एवढी कार्यसिद्धि होण्यास आया सुशिक्षित असल्या पाहिजेत ही मोठी अडचण आहे. सुशिक्षित आईचीं मुलें अशिक्षित राहिलीं आहेत असें उदाहरण पाहूं गेलें असतां कोठें सहसा मिळणार नाहीं. ह्यावरून हें निर्विवाद सिद्ध होतें कीं, मुलें सुशिक्षित करण्याची इच्छा

असेल तर आधीं त्यांची आई सुशिक्षित करण्याची खबरदारी घेतली पाहिजे म्हणजे झालें ह्या दृष्टीनें पाहिलें असतां स्त्रीशिक्षणाचा प्रश्न पुरुषशिक्षणानंतरचा मुळींच नसून तो उलट अत्यंत अगोदरचा आहे, व स्त्रीशिक्षण हें स्त्रियांच्या फायद्याकरितांच नसून अप्रत्यक्ष रीतीनें पुरुषशिक्षणाचें महान् कार्यकारी असें एक साधन आहे; " जिचे हातीं पाळण्याची दोरी ती जगातें उद्धारी " ह्या म्हणीचाही अर्थ वरील विवेचनावरून पूर्णपणें ध्यानांत येईल.

१०. लहान मुलांच्या शिक्षणाचा फायदा होऊनही स्त्रीशिक्षणापासून पुरुषवर्गाला आणखी दुसरे अत्यंत महत्वाचे असे फायदे होऊं शकतात. साधारणतः कोणताही समाज कोणच्या स्थितींत आहे हें ठरविण्याचें सुलभ साधन पाहिजे असल्यास त्या समाजांत स्त्रियांची स्थिति काय आहे हें कळलें असतां सहज अनुमान बिनचुकपणानें करतां येतें. " यत्र नार्यस्तु पूज्यंते रमन्ते तत्र देवताः " ह्या वाक्यांत फार खोल अर्थ भरला आहे. इतिहासावरूनही पाहिलें तर स्त्रिया शहाण्या सुत्या असल्यापासून फार फायदा झालेला आढळून येईल. श्रीशिवाजी-महाराजांचे मुख्य गुरु जरी दादोजी कोंडदेव असले तरी आद्यगुरु त्यांच्या मातोश्री जिजाबाईसाहेब होत्या, व त्यांच्या उत्तम नीतिमत्तेचा व सच्छीलाचा दृढ पाया जिजाबाईनीं घातला नव्हता असें कोण म्हणेल ? अहल्याबाई होळकर, बायजाबाई शिंदे ह्यांच्यासारखीं स्त्रीरत्नें ज्या ज्ञातींत पैदा झालीं त्या ज्ञातींतल्या पुरुषांना स्त्रिया शहाण्या असल्यापासूनचे फायदे सांगत बसण्याची वेळ पडावी काय ? कोणी येथें प्रश्न विचारतील कीं, जिजाबाईना लिहितां वाचतां कधीं येत होतें ? मी उलट प्रश्न विचारतों कीं, शिवाजीमहाराजांना तरी कुठें येत होतें ? असें असून तुम्ही पुरुषांना मात्र शिक्षण पाहिजे म्हणून अट्टाहास करतां आहां, पण स्त्रीशिक्षणाची गोष्ट काढतांच नाकें मुरडूं लागतां ह्याला काय म्हणावें ? अगदीं शेती करणाऱ्या मराठ्याला ज्याप्रमाणें चार अक्षरें यावींत अशी आपण हल्लीं इच्छा करीत आहोंत तितक्याच जरूरीनें त्या शेतकऱ्याच्या घरधनिणीलाही चार अक्षरें अवश्यमेव आलीं पाहिजेत ह्यांत तिळमात्र शंका मनांत राहूं देऊं नका असें माझें तुम्हांस अत्यंत आग्रहाचें सांगणें आहे. शिक्षण हें दुधाप्रमाणें आहे; तें फक्त पुरुषांना गुण करितें व स्त्रियांना अपाय करितें ही कोती समजूत सोडून दिली पाहिजे. ह्या कामीं आपण ब्राह्मणज्ञातींपेक्षां युरोपिअन व पारशी लोकांचें जितकें अनुकरण करूं तितक्या लवकर आपला समाज उच्च पाहिरीला चढत जाईल अशी माझी अत्यंत मनोभावेंकरून श्रद्धा आहे.

११. आणखी एका गोष्टीबद्दल बोलल्याशिवाय माझ्याच्यानें राहवत नाहीं. आपली ही परिषद् स्थापन होऊन पांच वर्षें झालीं, एवढ्या काळांत आपण किती कार्य उरकून टाकलें आहे असा कोणीं प्रश्न केल्यास त्याचें उत्तर फारसें समाधानकारक देतां येईल असें कांहींना वाटत नाहीं. आजपर्यंत झालेल्या कामाची महती कमी करण्याच्या उद्देशानें ही टीका होत नसून पेस्तर सालीं जास्त काम उभारलें जावें ह्या सद्धेतूनेंच ही टीका होत असते असें आपण सदैव समजत असावें. कारण सृष्टीचा असा एक नियम आहे कीं, थोडेसेही परिश्रम केले कीं लगेच विश्रांति घेण्याची इच्छा सुरू होते; म्हणून आपण काम करीत नाहीं म्हणून आपणास टोंचणारे लोक हे आपले शत्रू नसून निवळ हितचिंतकच होय. उघडच आहे, ज्याच्या मनांत कळकळ वसत असेल तोच काम न झाल्याबद्दल दोष देण्यास प्रवृत्त होईल. दरसाल नाताळचे सुट्टींत आपण दोन दिवस एके ठिकाणीं जमून ऊहापोह करितों यामुळें एकमेकांचे विचार कळण्यास फार उत्तम संधि मिळते हा परिषदेच्या बैठकीपासून मोठा लाभ होतो ही गोष्ट खरी आहे, परंतु मनात उत्तम बेत ठरविला पण त्याप्रमाणें हातून एकही कृति घडली नाहीं तर उपयोग काय ?

परिषदेला येण्यांत दोन हेतु असले पाहिजेत. एकमेकांचे विचार ऐकणें हें आतां विशेष महत्वाच राहिलें नाहीं. मराठ्यांमध्यें शिक्षण जारीनें सुरुं झालें पाहिजे ह्या एका विचारांत सर्व गोष्टी आल्या. आपण वर्षभर ह्या कार्यांत किती खटपटी केल्या, किती अंगमेहनत घेतली, किती द्रव्यद्वारां झीज सोसली ह्याचा हिशोब देण्याकरितां परिषदेपुढें आपणास सालअखेरीस उभें राहून जबाब लिहून द्यावा लागेल ही जाणीव सर्वांच्या हृदयांत स्पष्टपणें उत्पन्न झाली पाहिजे. परिषदेला जाणें म्हणजे दोन दिवस मौज मारण्यास जाणें नसून कडक व निष्ठुर अशा मालकापुढें आपल्या कामाचा रिपोर्ट देण्यास आपण जातों आहोंत व तेथें खरा न्याय होऊन योग्यतेप्रमाणें शाबासकी मिळेल अथवा कामांत कुचराई केल्याबद्दल दंड द्यावा लागेल, अशी प्रत्येक सभासदाची समजूत झाली पाहिजे. ज्या ज्या ठिकाणीं आपण प्रत्येकजण रहातों त्या त्या ठिकाणीं आपण मराठ्यांच्या शिक्षणाची काय काय खटपट केली ह्याचा लेखी रिपोर्ट प्रत्येक सभासदानें डिसेंबरच्या पहिल्या तारखेस सेक्रेटरीकडे सादर केला पाहिजे, व ह्या सर्व रिपोर्टांवरून एक जनरल रिपोर्ट सेक्रेटरीनीं परिषद सुरू होण्यापूर्वीं वाचून दाखवावा. असा लेखी जबाब देण्याचा बोजा डोक्यावर असला म्हणजे हातून किती झटझट काम उठेल याचें ज्याचें त्यालाच आश्चर्य वाटूं लागेल. काम करण्याच्या शेंकडों दिशा आहेत; काम करूं लागल्याबरोबर ज्याला त्याला आपल्या योग्यकाम कोणचें तें सहज सुचेल व ज्यानें त्यानें आपआपल्या लायकीप्रमाणें बोजा उचलला आहे कीं नाहीं तेंही ठरविणें फारसें कठीण जाणार नाहीं. रोज सकाळीं उठल्याबरोबर पांच मिनिटें परमेश्वराचें स्तोत्र म्हटल्यावर जर स्वज्ञातीच्या शिक्षणाचा म्हणजे उन्नतीचा प्रत्येक माणूस विचार करील व रात्रीं निजण्यापूर्वीं त्या प्रश्नासंबंधानें 'आज आपण काय केलें' ह्या प्रश्नाचें स्वतःशीं उत्तर देईल तर कामाचे डोंगर पडून राहतील. ह्यांत द्रव्याचा प्रश्न नाहीं, निव्वळ कळकळीचा प्रश्न आहे. अत्यंत गरीब अशा माणसानें एका सालांत एका शेतकऱ्यास तरी लिहिण्यावाचण्यास शिकविण्याचा विचार अंमलांत आणला तर पांच चार वर्षांत किती अवाढव्य काम पार पडेल ह्याची कल्पना करा. परंतु हल्लीं ह्याच्या बहुतेक उलट प्रकार दृष्टीस पडतो आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे व तें खरें आहे कीं नाहीं ह्याचा निर्णय ज्याचा त्यानें ठरवावा. चार दिवस नाताळांत परिषदेच्या गांवीं जाऊन मित्रमंडळीबरोबर सहभोजन केलें व परिषदेच्या मांडवांत बसून भाषणें ऐकलीं व केलीं व पराकाष्ठा दोन चार रुपयांची वर्गणी दिली कीं इतिकर्तव्यता झाली, हीच समजूत बरीच प्रचलित आहे. ही समजूत जाऊन नेटानें काम सुरूं होईल ह्या हेतूनेंच मी हें बोलत आहे.

14 १२. ह्या पवित्र कामांत सरकारी नोकरांनीं कोणच्याही प्रकारचा किंतु बाळगण्याचें मुळींच कारण नाहीं. सरकारास हे आपले प्रयत्न मनापासून पाहिजे आहेत; आपल्या परिषदेस अथपासून इतिपर्यंत सर्व सरकारी हुद्देदारांची पूर्ण सहानुभूति आहे. दिल्ली येथील दरबारांत खुद्द सम्राट् पंचम जॉर्ज यांनीं पन्नास लक्ष रुपयांची देणगी प्राथमिक शिक्षण विस्तृत व सुलभ करण्याकरितां देऊन दरसाल त्या रकमेंत अशीच मोठी भर टाकण्याचें अभिवचन दिलें आहे. ह्या एकाच गोष्टीवरून सरकारदरबारांत ह्या शिक्षणाची किती आवश्यकता भासत आहे ह्याची कल्पना तुम्हांस सहज होईल. आजपर्यंत ज्या ज्या प्रांतांत आपली परिषद भरत गेली त्या त्या प्रांतांतल्या मुख्य अधिकाऱ्यांनीं सर्वतोपरी तिला मदत केली आहे. मुंबईस तर प्रत्यक्ष टाऊन हॉलच आपल्या बैठकीस सरकारानें कृपाळू होऊन दिला होता हें आपल्या स्मरणांत असेलच. हें सर्व पुनः सांगण्याचा हेतु इतकाच कीं, आपणांतील लहानसहान नोकरांनीं सुद्धां शिक्षणाचें पवित्र कार्य करतांना मनांत यत्किंचितूही दहशत बाळगण्याचें कारण नाहीं. ह्यात राजकीय वगैरे बाबींचा थोडाही वास असता तर आपणापैकीं पुष्कळ मंडळी एकदम ह्या परिषदेंतून आपलें अंग काढून घेतील, हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं.

ळीस कामाचा अनुभव मिळेल आणि इतर खेड्यांत ह्या तन्हेनें काम करण्यास सुलभ जाईल. परिषदेचे कामीं दरवर्षी निदान हजार दीड हजार रुपये खर्च होत असतो. त्यांतून काटकसर करून निदान एक-दोन खेड्यांत प्रयोगादाखल शाळा स्थापण्यासाठीं शेंदीडशें रुपये खर्च करून वर सांगितल्याप्रमाणें अनुभव मिळविण्याचा प्रयत्न केल्यास वावगें होईल असें मला वाटत नाहीं.



हासप्रसिद्ध मराठेज्ञातीस शिक्षणामृत पाजून अमर करावें, व परिषदेनें अंगीकृत केलेली जबाबदारी पार पाडण्यास प्रत्येकानें झटावें.

२७. आपण आज इतिहासप्रसिद्ध नागपूरकरांचा पाहुणचार घेत आहोंत. अशा इतिहासप्रसिद्ध शहरांत आपलें अधिवेशन होत आहे. ही आपल्या कार्याच्या भावी उत्कर्षाची खूण-गांठ आहे, असें मी समजतों. नागपूरकरांनीं आपणा सर्वांस येथें येण्याचें आमंत्रण देऊन आपला जो गौरव केला, त्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करून आपल्या ज्ञातीस त्यांनीं ऋणी केलें याबद्दल त्यांचे आभार मानतों.

आपण माझें भाषण इतका वेळ शांत चित्तानें ऐकिलें याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहें. मला ह्या बैठकीच्या अध्यक्षाचा मान देऊन आपण माझा जो गौरव केला त्याबद्दल सर्व प्रतिनिधी आणि नागपूरकर बांधवांचा मी अत्यंत आभारी आहें. स्वागतमंडळानें मोठ्या उत्साहानें ही परिषदेची कामगिरी शिरावर घेऊन कळकळीनें आणि आस्थेनें पार पाडली, याबद्दल त्यांचे आणि मराठा ज्ञातीचें भूषण असे इतिहास प्रसिद्ध उभय राजेसाहेब भोसले ह्यांचें अभिनंदन करून आपणा सर्वांतर्फे मी त्यांचे आभार मानतों. नागपूरकर मंडळींचा उत्साह आणि कळकळ दिवसेंदिवस शुक्लेंदुवत् वाढो, तसेंच आपले परमपूज्य बादशहा पंचम जॉर्ज व महाराणी मेरी यांचा हिंदुस्थानांतील प्रजास सुखाचा जावो आणि त्यांचा सर्वत्र विजय होवो. अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.

इंदुप्रकाश स्टीम प्रेस-मुंबई.

## दि एडवर्ड मेमोरियल–मराठा–एज्युकेशनल फंड.

२५. आपले खिस्तवासी परमपूज्य बादशहा यांनीं आपल्या अनुकरणीय गुणांनीं आणि शांतताप्रिय आचरणानें सर्व देशांत शांततेचें साम्राज्य कायम ठेवलें होतें. ते आपल्या हिंदीप्रजेसाठीं नेहमीं कळकळ बाळगून प्रेम व्यक्त करीत असत. ज्यांनीं आपल्या शांततामय राज्यनीतीनें (Edward—The peace maker) हें प्रिय नामाभिधान अबालवृद्धांकडून मिळविलें. त्या आपल्या परलोकवासी बादशहाबद्दल आम्हीं आपलें निर्मळ प्रेम, सकौतुक अभिमान आणि निस्सीम राजनिष्ठा व्यक्त करणें फार अगत्याचें आणि आवश्यक आहे. विद्यादानाच्या योग्यतेचें दुसरें कोणतेंही काम पुण्यप्रद नाहीं; म्हणून अशा पुण्यप्रद द्वारेंच आपल्या महाभाग बादशहाचें स्मारक करण्याचें काम आपल्या शिक्षण–परिषदेनें हातीं घेतलें आहे ! आणि उच्चप्रतीच्या शिक्षणासाठीं "दि एडवर्ड मेमोरिअल मराठा एज्युकेशनल फंड" स्थापन केला आहे. आपल्यांतील उदारधि आणि धनिक ह्या स्मारकास उदारपणें मदत करून मरहुम पूज्य बादशहा यांच्या विषयींची आपली अभंग राजनिष्ठा व्यक्त करतील आणि त्यांचें नांव आपल्या समाजांत अजरामर करतील आणि अशी अनायासें प्राप्त झालेली संधि माझे मराठे बांधव वायां जाऊं देणार नाहींत, अशी मला संपूर्ण आशा आहे.

२६. या फंडास आजपर्यंत अदमासें चाळीस हजार रुपयेंपर्यंत रकमेचीं अभिवचनें मिळालीं आहेत, आमच्या अफाट समाजांत विद्याप्रसार करण्याच्या अकटोविकट कार्यास लागणाऱ्या द्रव्याचे मानानें ही रक्कम म्हणजे "दर्यामें खसखस" या म्हणीप्रमाणें अत्यल्प आहे. हल्लींच्या काळीं समाजाची उन्नति करून घेणें बहुश: ज्या त्या समाजाच्या हातची गोष्ट आहे. आपल्यावरील सार्वभौम सरकारास जेवढी मदत करणें शक्य आहे तेवढी ते आनंदानें करीत आहेत. तेव्हां आतां आपण लौकर जागे होऊन हें महत्कार्य तडीस नेण्यास लहान थोर, श्रीमान–गरीब ह्या सर्वांनीं काया–वाचा–मनेंकरून कंबर बांधिली पाहिजे. द्रव्यरूपानें साहाय्य देणें सर्वांसच शक्य नसतें. जो जी मदत देईल ती आपणास हवीच आहे. व्यक्तीचें काय किंवा समाजाचें काय, जोंपर्यंत स्वार्थत्याग करण्यास तो तयार होणार नाहीं, तोंपर्यंत त्याच्या उन्नतीची आशा केवळ मृगजलाप्रमाणें आहे. आपल्या मराठ्यांचें दानशूरत्व इतिहासप्रसिद्ध आहे. तें कसोटीस लागण्याची वेळ ही आहे. हें कृत्य आपणास दुसऱ्याकरितां करावयाचें नसून, आपल्या स्वतःच्याच उन्नत्यर्थ करावयाचें आहे. वेळींच जागा होऊन जो कार्यास लागतो तोच तरतो. जो जागा होत नाहीं, त्यास अगाध आणि अनंत अशा काळाचे पोटांत जागा मिळून त्याचें नामही शेष रहात नाहीं. तेव्हां सर्व बांधवांस, मग ते आज, येथें हजर असोत किंवा इतर ठिकाणीं असोत, माझी अत्यंत कळकळीची विनंति आहे कीं, त्यांनीं ह्या परिषदेच्या कामास मनापासून हातभार लावावा आणि आपल्या इतिहासप्रसिद्ध मराठेज्ञातीस शिक्षणामृत पाजून अमर करावें, व परिषदेनें अंगीकृत केलेली जबाबदारी पार पाडण्यास प्रत्येकानें झटावें.

१३. आपल्या परिषदेच्या सक्त नियमांप्रमाणें व्हाइसरॉयांच्या कायदे कौन्सिलापुढें आलेल्या कायद्यांच्या बिलांसंबंधानें आपणास ऊहापोह करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु निव्वळ शिक्षणविषयक गोष्ट कांहीं तेथें चालू असेल तर आपण त्याविषयीं अवश्य तो विचार केला पाहिजे. ना० मि. गोखले यांनीं हल्लीं सुप्रिम लेजिस्लेटिव्ह कौन्सिलपुढें जें बिल आणलें आहे तें निव्वळ शिक्षणविषयक आहे. स्थानिक परिस्थितीप्रमाणें प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें करण्याचा अधिकार म्युनिसिपालिटीज् व लोकल बोर्ड्स् यांना देण्याविषयीं तें बिल आहे. प्राथमिक शिक्षण बहुतेक मोफत व सक्तीचें असें हल्लीं सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतून चालू झालें आहे. ह्या परिषदेनें दरसाल मोफत व सक्तीच्या शिक्षणाविषयीं सरकारास विनंति करणारा ठराव पास करून दसरीं ठेवलेला आहे. तेव्हां सक्तीचें व मोफत शिक्षण दिलें तर आपणांतील शेतकरी वर्गास अत्यंत फायदा होईल ह्याबद्दल वाद नाहीं. अर्थात् ह्या बिलाचा मुख्य उपयोग मागसलेल्या ज्ञातींनाच फार होणारा आहे. याकरितां नामदार गोखले यांच्या या बिलाला या परिषेदचा एकमतानें पूर्ण पाठिंबा मिळेल याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. त्या बिलाचा कौन्सिलांत काय निकाल होतो ह्याकडे सर्व विचारी मराठे मंडळी आशापूर्ण नजरेनें पहात आहेत.

१४. आतां फक्त एकाच गोष्टीविषयीं बोलून मी आपलें भाषण संपवितों. नागपूरकर मराठे मंडळींनीं यंदां परिषदेबद्दल जी आस्थापूर्वक खटपट केली, तिचें मूर्तस्वरूप आतां आपणां सर्वांस प्रत्यक्ष दिसतेंच आहे. नागपूर हें पूर्वी भोंसले घराण्याचें वसतिस्थान असल्यामुळें त्यांच्या अनुषंगानें बरींच मराठी कुटुंबें नानाप्रकारच्या व्यवसायांमुळें इकडे आलीं. त्या सर्वांचा इतर ठिकाणच्या मराठे मंडळीशीं परिचय होण्यास ह्या परिषदेनें फार उत्तम संधि आणून दिली व ह्या संधीचा उपयोगही नागपूरकर मराठे मंडळींनीं योग्य तऱ्हेनें करून घेऊन आपणां सर्वांस त्यांनें कायमचें ऋणी करून ठेविलें आहे. निरनिराळ्या प्रांतांत परिषद् फिरण्यापासून हा एक अपूर्व लाभ सर्वांना होत असतो. तो यंदां आपणांस विशेष तऱ्हेनें झाला आहे हें कोणीही कबूल करील. त्याचप्रमाणें ज्या तरुण स्वयंसेवकांनीं रात्रंदिवस खटपट करून पाहुण्यांचें आदरातिथ्य करण्याची तयारी करण्यांत कौशल्य दाखविलें आहे त्यांचें विशेष अभिनंदन केल्याशिवाय राहणें अशक्य आहे. या उत्तम तयारीपासून होणारें सुख तुमच्या अनुभवास येईलच.

१५. अखेरीस माझें भाषण आपण सर्वांनीं इतक्या शांतपणानें व सहानुभूतीनें ऐकून घेऊन माझा जो गौरव केला त्याबद्दल माझी कृतज्ञता कशी व्यक्त करावी, तेंच मला समजत नाहीं, एवढेंच मी सांगतों. प्रथम मीं म्हटलेंच आहे कीं, ज्ञानवृद्ध अथवा वयोवृद्ध असा मी नसून आपणांपुढें अधिकारयुक्त वाणीनें भाषण करण्याची माझी यत्किंचितही पात्रता नाहीं. आपण प्रोत्साहन दिल्यामुळें वेडेवांकडे चार शब्द मीं आपणांपुढें बोबड्या भाषेंत बोलून दाखविले आहेत, त्याचें कौतुक तें आपण प्रेमपुरःसरपणानें त्यांकडे नजर दिली व दोष पोटांत घातले तरच करतां येण्यासारखें आहे, हें मी जाणून आहें. ह्या आपल्या कृपेबद्दल पुनः एकवार सर्वांचे आभार मानून मी हें भाषण पुरें करितों.

पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.

## ELEMENTARY EDUCATION BILL.

The Hon'ble Mr. Gokhale said: "My Lord, I rise to ask for leave to introduce a Bill to make better provision for the extension of elementary education throughout India. Hon'ble Members will recollect that about this time last year, the Council considered a resolution which I had ventured to submit to its judgment, recommending that elementary education should gradually be made compulsory and free throughout the country, and that a mixed Commission of officials and non-officials should be appointed to frame definite proposals. In the debate, which ensued on the occasion, fifteen Members, including the Home Member, the Home Secretary and the Director General of Education, took part. There was then no separate portfolio of Education, and educational interests rubbed shoulders with jails and the police, in the all-comprehensive charge of the Home Department. In the end, on an assurance being given by the Home Member that the whole question would be carefully examined by the Government, the resolution was withdrawn. Twelve months, my Lord, have elapsed since then, and the progress which the question has made during the interval has not been altogether disappointing. In one important particular, indeed, events have moved faster than I had ventured to hope or suggest. One of the proposals urged by me on the Government last year was that Education should, to begin with, have a separate Secretary, and that eventually there should be a separate Member for Education in the Governor General's Executive Council. The Government, however, have given us at one bound a full-fledged Department of Education, and the Hon'ble Mr. Butler has already been placed in charge of it. My Lord, the Hon'ble Member's appointment to the new office has been received with general satisfaction, and it is recognised on all sides that he brings to his task a reputation for great practical capacity. What I value, however, even more than his practical capacity, is the fact that the Indian sun has not dried the Hon'ble Member and that he has not yet shed those enthusiasms with which perhaps we all start in life, and without which no high task for the improvement of humanity has ever been undertaken. I think, my Lord, the creation of a separate portfolio for Education brings us sensibly nearer the time when elementary education shall be universal throughout India. That there is a strong demand for this in the country—a demand, moreover, daily growing stronger—may be gathered from the fact that, since last year's debate, the question has been kept well to the fore by the Indian Press, and that last December resolutions in favour of compulsory and free primary education were passed not only by the Indian National Congress at Allahabad, but also by the Moslem League, which held its sittings at Nagpur. On the Government side, too, the declaration made in the House of Commons last July by the Under Secretary of State for India that one of the objects of the creation of the new Education Department was to spread education throughout the country, the significant language employed by Your Lordship on the subject of education in your reply to the Congress address at the beginning of this year, and the Educational Conference, summoned by the Hon'ble Mr. Butler last month at Allahabad—all point to the fact that the Government are alive to the necessity of moving faster and that it will not be long before vigorous measures are taken in hand to ensure a more rapid spread of mass education in the land. The present thus is a singularly favourable juncture for submitting to the Council and the country the desirability of a forward move, such as my Bill proposes, and I earnestly trust the Council will not withhold from me the leave I ask to introduce the Bill.

"My Lord, I expect the Government have now concluded their examination of my proposals of last year, and perhaps the Hon'ble Member will tell us to-day what conclusions have been arrived at. The part of the scheme to which I attached the greatest importance was that relating to the gradual introduction of the principle of compulsion into the system of elementary education in the country, and that part is now embodied in the Bill which I wish to introduce to-day. My Lord, an American legislator, addressing his countrymen more than half a century ago, once said that if he had the Archangel's trump, the blast of which could startle the living of all nations, he would sound it in their ears and say: 'Educate your child-